(25)

Ramanand Teerth
Marathwada University
"Dnyanteerth" Vishnupuri,
NANDED - 431606. (M.S.)

तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ
"ज्ञानतीर्थ" विष्णूपुरी,
नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

Ref./संदर्भ जा.क्र. आस्था/३/नियुक्ती--आदेश/२०११--१२/ 3031 Date / दिनांक २४/११/२०११

शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नियुक्तीपत्र

प्रति,

✓ डॉ.पवार सुरेखा मोहनराव
घर क्र.०३ गंगा बिल्डींग,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परीसर,
वजिराबाद,नांदेड — ४३१ ६०१

**Speed Post**

१. विद्यापीठाची जाहीरात क्र SRTMUN/NTP-3/2011,Date-16-08-2011 नुसार घेण्यात आलेल्या दि.२३/१०/२०११ ची लेखी परीक्षा व दिनांक १३/११/२०११ रोजी झालेल्या मुलाखतीच्या अनुपंगाने आपणास कळविण्यात येते की, या आदेशाद्वारे विद्यापीठात आपली नियुक्ती गट 'अ' मधील वैद्यकीय अधिकारी (निवासी) या शासन मान्य पदावर खुला प्रवर्गातून रु. ९३००--३४८०० या वेतन बॅड मध्ये रु. १४,४५० वेतन अधिक रु. ५,४०० ग्रेड पे नुसार एकूण रु. १९,८५० या प्रारंभिक मूळ वेतनावर शासन मान्यतेच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

२. दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ नंतर आपली नियुक्ती झाल्यामुळे आपणास महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अंनियो १००५/१२६/सेवा--४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ नुसार नवीन "परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना" लागू राहील. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना आपणास लागू होणार नाही" किंवा महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अंनियो १००९/प.क्र.३२/सेवा ४, दिनांक १८ ऑगष्ट, २००९ नुसार १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असल्यास व वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अंनियो १००६/८७/सेवा ४, दिनांक १२ जानेवारी, २००७ मधिल (i) ते (iv) मध्ये नमुद केलेल्या सर्व अटींची पुर्तता झाल्यास आपणास निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होईल.

३. आपली नियुक्ती दोन वर्षाच्या परिविक्षाधिन कालावधीसाठी आहे. परिविक्षाधिन काळात आपली सेवा एक महिन्याची पूर्व सूचना देवून समाप्त करता येवू शकते.

४. एक वर्षाच्या परिविक्षाधिन कालावधीच्या समाप्तीनंतर साधारणपणे, आपले समाधानकारक कामकाज, वर्तणूक आणि त्या विषयी आपल्या विभाग प्रमुखांच्या व वरिष्ठांच्या अहवालाच्या आधारे आपणास वार्षिक वेतन वाढ अनुज्ञेय राहील.

५. परिविक्षाधीन काळ संपुष्टात आल्यानंतर प्रत्यक्ष सेवेत कायम सामावून घेतल्याचे आदेश निर्गमित झाल्याशिवाय आपली नियुक्ती कायम गृहीत धरता येणार नाही.

६ आपली सेवा महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ अन्वये विद्यापीठाने तयार केलेले आणि वेळोवेळी अंमलात येणारे अध्यादेश, अधिनियम, नियम इत्यादी त्याच प्रमाणे विविध अधिकार मंडळानी प्राप्त अधिकारानूसार केलेले नियम, त्याचप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा नियम,१९८१ तसेच शासन नियमातील वेळोवेळी होणाऱ्या तरतूदींच्या अधीन राहील.

७. आपणास शासन नियमा प्रमाणे वेळोवेळी अंमलात राहणाऱ्या दराने निर्दिष्ट भत्ते अनुज्ञेय असतील.

(कृ.मा.प.)

Phone : (02462) EPBX : 229242, 229243, Fax : 229245, 229064, 259383 website : www.srtmun.ac.in

So Mgt Sci
Snm 24-2-2020
For BIME
24.02.2020

PUB / March-08/100 Pad

...Ramanand Teerth
...arathwada University
"Dnyanteerth" Vishnupuri,
NANDED - 431606. (M.S.)

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ
"ज्ञानतीर्थ" विष्णुपुरी,
नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

Ref./ संदर्भ ________________ Date / दिनांक ________________

८. सदर नियुक्तीपत्र आपणास मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत आपण कामावर रुजू न झाल्यास हा आदेश आपोआपच रद्द होईल.

९. हे आदेश मान्य असल्यास सेवेत रुजू होण्यापूर्वी आपणास आपल्या सध्याच्या नियोक्त्याकडून (असल्यास) कार्यमूक्ती / सेवामुक्तीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१०. अ) आपला परिविक्षाधीन कालावधी समाप्त होण्यापूर्वी आपल्या कामाचे वेळोवेळी मूल्यमापन / मूल्यांकन करण्यात येईल. आवश्यक वाटल्यास परिविक्षाधीन कालावधी वाढविण्यात येईल. आपले काम असमाधानकारक आढळून आल्यास, सेवेतून कमी करण्यात येईल.

ब) आपला परिविक्षाधीन कालावधी समाप्त होण्यापूर्वी आपणास विद्यापीठाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. सदर परीक्षेस जास्तीत जास्त तीनच वेळा बसण्याची संधी देण्यात येईल. जरुरी पडल्यास परिविक्षाधीन कालावधी वाढविण्यात येईल व परीक्षेत उत्तीर्ण होईपर्यन्त वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय होणार नाही. दिलेल्या संधीत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.

क) महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) मधील नियम ११ नुसार आपणास वैद्यकीय मंडळ / सक्षम वैद्यकीय अधिका–याकडून आपल्या शारीरिक क्षमतेविषयी आवश्यक प्रमाणपत्र सेवेत रुजू झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

ड) सेवेत रुजू होण्यापूर्वी आपली शैक्षणिक अर्हता, अनुभव, इत्यादी संबंधित सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या सत्यतेविषयी खात्री करुन घेण्यास्तव मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११. विद्यापीठाच्या सेवेत रुजू होतांना आपण विहीत नमुन्यातील हमीपत्र स्वत:च्या हस्ताक्षरात भरुन देणे आवश्यक आहे.

१२. भविष्यात पद निर्माण झाल्यास आपली प्रस्तुत विद्यापीठ नांदेड ,विद्यापीठाचे उपकेंद, लातुर व विद्यापीठ संचलीत न्यु मॉडेल डिग्री कॉलेज ( कला, विज्ञान व वाणिज्य ) हिंगोली येथे बदली झाल्यास तेथे रुजू होणे आपणास बंधनकारक राहील.

१३. वैद्यकीय अधिकारी या पदाबाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथ याचिका क्र.७७९५/२०११(डॉ.अमोल मोळके विरूध्द स्वारातीम विद्यापीठ) दाखल असून सदर नियुक्ती आदेश मा. न्यायालयाच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

कुलसचिव

प्रत माहिती व कार्यवाहिस्तव सादर :

१.मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–३२.
२.मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे–१.
३.मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड.
४.मा. कुलगुरुंचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
५.मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
६.अभिलेख विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

Phone : (02462) EPBX : 229242, 229243, Fax : 229245, 229064, 259383 website : www.srtmun.ac.in